# आरमोरी विधानसभा निवडणुकीच्या निकालावर मतदार वर्तनाचा प्रभाव

**विशाल अ. सोरते**
संशोधक विद्यार्थी

**डॉ. राष्ट्रापाल एस. गणवीर**
मार्गदर्शक
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर

---

***सारांश :***

*लोकशाहीमध्ये निवडणुकीला अनन्यसाधारण महत्व आहे. भारतामध्ये निवडणुका या केंद्रीय निवडणूक आयोगाच्या माध्यमातून आयोजित केल्या जातात. निवडणुकीच्या माध्यमातून सामान्य लोक हे राजकीय सहभाग नोंदविता असतात ज्याचे पर्यवसान हे सरकार स्थापनेमध्ये होत असते. महाराष्ट्राच्या 2019 च्या विधानसभा निवडणुकीच्या बाबतीत मतदार वर्तन हा बराच अंशी चर्चेस आलेला होता. मतदार वर्तनाचा परिणाम हा 2024 च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या बाबतीत बदलला गेला. मात्र आरमोरी विधानसभामध्ये मतदार वर्तन हा वेगळ्या घटकांना महत्व देणारा ठरला.*

---

**प्रस्तावना:**

लोकशाही ही एक जीवन पद्धती आहे. लोकशाहीत 'लोक' या शब्दात नागरिकांचा समावेश होतो. वंश, जात, धर्म, भाषा, लिंग, ओर्थिक उत्पन्न वा मालमत्ता, व्यवसाय इत्यादी गोष्टींवरून भेदभाव न करता, व्यक्तींना नागरिकांचे आणि मतदानाचे समान हक्क बहाल केल्या जाते. शिवाय हे लोकशाहीतील प्रधान तत्व सुद्धा मानले गेले आहे, 'लोकांचे, लोकांसाठी, लोकांद्वारे चालविले जाणारे शासन म्हणजे लोकशाही' असे अब्राहम लिंकन यांनी लोकशाही विषयी विचार व्यक्त केले आहे. तसेच, "ज्या शासनात प्रत्येकाला सहभागी होता येते ती लोकशाही होय" अशी प्रा. सिलीनी लोकशाही विषयीची मांडणी केलेली दिसून येते. वरील विचारांचा परामर्श घेतल्यास असे दिसून येते की, लोकशाही ही शासनाची अशी पद्धत आहे, ज्यामध्ये लोक सार्वभौम असून राज्याची सत्ता ही समाजातील विशिष्ट वर्गाच्या हाती नसते. राज्य लोकांसाठी चालविले जात असून प्रत्येक लोकशाही राज्यात सर्व नागरिकांना सहभागी करून घेतल्या जाते. नागरिक हे स्वतः किंवा जन प्रतिनिधीद्वारे निवडणुकिंच्या माध्यमातून लोकशाहीमध्ये सहभाग नोंदवीत असतात आणि म्हणूनच 'निवडणुका' लोकशाहीच्या अस्तित्वाचे प्रभावी माध्यम म्हणून ओळखले जाते. भारतामध्ये सुद्धा नागरिक है निवडणुकिंच्या माध्यमातून लोकशाहीमध्ये सहभागी होतात. त्यासाठी भारतीय राज्यघटनेमध्ये कलम 324 अन्वये स्वतंत्र निवडणूक आयोग स्थापन करून "लोकप्रतिनिधित्व कायदा 1951" च्या आधारे भारतीय निवडणूका निपक्ष, पारदर्शी व निर्भीडपणे या घेतल्या जातात. 1952 च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीपासून 2024च्या 18 व्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये व याच दरम्यान भारतातील वेगवेगळ्या घटक राज्यांतील निवडणुकांच्या माध्यमातून भारतीय नागरिक आपला सहभाग मतदानाच्या माध्यमातून नोंदवितांना दिसून येते.

स्वतंत्र भारतात सुरूवातीच्या तीन सार्वत्रिक निवडणुकांमध्ये स्वातंत्र्यपूर्व काळातील वलयांकित नेतृत्व व संघटनात्मक पक्ष बांधणीचा प्रभाव असल्याने मतदारांचा कौल हा काँग्रेस पक्ष्याच्या बाजूने दिसून येतो. मात्र, 1967 व त्यानंतरच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये भारतीय मतदारांमध्ये वेळोवेळी घडून आलेला बदल हा भारतीय लोकशाहीच्या बळकटी करणासाठी योग्य ठरतोच शिवाय यामुळे यशस्वी दिशेला वाटचाल करणारी दिसून येते. या निवडणुकांमध्ये बदलत्या नेतृत्वाबरोबरच विविध नवीन राजकीय पक्षांची निर्मिती व त्यांचे धोरण हे सामाजिक, आर्थिक न्याय प्रस्थापित करण्याच्या हेतूने पुरस्कृत होऊन लढल्या व लढवल्या गेल्याचे दिसून येते. यामधूनच बँकांचे राष्ट्रीयकरण, गरिबी हटाव, इंदिरा गांधींच्या मृत्यूची सहानुभूतीची लाट, शहाबानो खटला, बोफोर्स घोटाळा, मंडलवाद, रथयात्रा, बाबरी मस्जिद इत्यादी घटक हे प्रभावी ठरल्याचे दिसून येते. याबरोबरच जात, धर्म, भाषा, प्रांत, इत्यादी महत्वाच्या घटकांच्या आधारे राजकीय पक्षांनी निवडणूक लढविण्याचा चंग बांधलेला दिसून येते.याशिवाय आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानातिल प्रगतीच्या अनुषंगाने वृत्तपत्रे , साप्ताहिक,पाक्षिक,रेडिओ, टी. व्ही. व समाज माध्यम अश्या विविध माध्यमांचा भारतीय मतदारांवर प्रभाव पडल्याचे अनेक निवडणुकींच्या निकालावरून दिसून येते.

महाराष्ट्रामध्ये एकूण 36 जिल्हे आहेत. परिसीमन अधिनियम 2002 च्या आयोगाने 2003 मध्ये झालेल्या सुधारनेनुसार, भारताच्या आणि महाराष्ट्र शासनाच्या दिनांक 28 मार्च 2006 च्या राजपत्रामध्ये प्रकाशित केलेल्या आदेश क्रमांक २१ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेकरीता एकूण 288 जागा असतील असे निश्चित केले .त्यानुसार गडचिरोली जिल्ह्यात तीन विधानसभेच्या जागा येतात व ह्या तिन्ही जागा अनुसूचित जमातीकरिता राखीव आहेत. त्यामध्ये आरमोरी (68), गडचिरोली(68) व अहेरी(69) या विधानसभा मतदारसंघांचा समावेश होतो.

प्रस्तूत शोधनिबंधाच्या माध्यमातून आरमोरी विधानसभा मंतदारसंघातिल 2019 व 2024 च्या निवडणुकीमध्ये मतदार वर्तनाचा निकालांवर पडलेल्या प्रभाव हा महाराष्ट्रातील विधानसभा निकालांच्या संदर्भात बघणे. त्याशिवाय महाराष्ट्रातील विधानसभा आणि आरमोरी विधानसभा मतदारसंघातील मतदारांचा वर्तनाचा पडलेल्या प्रभावाचा व त्याच्यातील परिणामांचा विश्लेषण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**बिजसंज्ञा :** भारतीय लोकशाही, निवडणूक , मतदार वर्तन, आदिवासी ,आरमोरी विधानसभा आदी.

**शोधनिबंधाची मर्यादा:**

प्रस्तुत शोधनिबंध हा आरमोरी विधानसभा मतदारसंघापूर्ती मर्यादित आहे. यामध्ये 2019 व 2024 या निवडणुकीच्या निकालांचा परामर्श घेतला गेल्या आहे. शिवाय एप्रिल- मे 2024 मध्ये झालेल्या सर्वसाधारण लोकसभा निवडणुकीच्या बाबतीत महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीमध्ये झालेला बदल. याबरोबरच मतदार वर्तनाच्या परिणामांच्या अनुषंगाने आरमोरी विधानसभेचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**शोधनिबंधाचे उद्दिष्टे :**

१) आरमोरी विधानसभा क्षेत्रातील मतदार वर्तनाचा निकालांवर पडलेल्या प्रभावाचा अवलोकन करणे.

२) महाराष्ट्रातील इतर विधानसभा व आरमोरी विधानसभा यातील मतदार वर्तनाचा विश्लेषण करणे.

**महाराष्ट्रातील राजकारण :**

भारतामध्ये महाराष्ट्र हा राजकीय,सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व भौगोलिक अनुषंगाने प्रगतशील असल्याकारणाने या राज्याकडे सर्वांचेच लक्ष वेधलेले असतात. अशातच भारतामध्ये संघराज्य पद्धतीचा अवलंब केला गेला असल्याने राज्याच्या निवडणुकीकडे अतिशय महत्त्वपूर्णपणे बघितल्या जाते.महाराष्ट्रासारखा पुरोगामी राज्य असणाऱ्या राज्यात विधानसभा निवडणुका या देशाच्या दिशा अधोरेखित करत असतात. अशा निवडणुकीचा निकाल हा भारताच्या संघराज्य पद्धतीवर नेहमीच एक प्रभावशील राहिलेला आहे.2019 व 2024 च्या महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुकीकडे बघितले असता बराच असा बदल आपल्याला दिसतो.

सन 2019 च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकी साठी 21 ऑक्टोबर 2019 रोजी एकाच दिवशी संपूर्ण महाराष्ट्रात 288 जागांसाठी मतदान झाले. व निकाल 24 ऑक्टोबर 2019 रोजी लागला. यानिवडणुकीत एकूण 61.4% मतदान झाले होते. या निवडणुकीमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडी व संयुक्त पुरोगामी आघाडी हे दोन्हीही दृश्य निवडणुकीमध्ये निकालापर्यंत बघायला मिळाले. मात्र निवडणुकीच्या निकालानंतर यामध्ये बराच अंतर निर्माण झालेला दिसतो. निकालामध्ये भारतीय जनता पक्ष 105, शिवसेना 56, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष 54, तर भारतीय राष्ट्रीय काँग्रेस 44 यांनी एवढ्या जागा जिंकल्या.

सत्तासंघर्षाच्या वर्चस्वात आजपर्यंत आघाडीमध्ये असलेल्या शिवसेनेने भाजपाला पाठिंबा न देण्याच्या कारणावरून पेच निर्माण झाला. सोबतच मुख्यमंत्री पदाचा प्रश्नचिन्ह निर्माण झाला. यास अपवाद म्हणून दिनांक 23 नोव्हेंबर 2019 रोजी पहाटे श्री. देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या श्री.अजित पवार यांच्याबरोबर शपथ घेतली मात्र विधानसभेत बहूमत सिद्ध करण्यापूर्वीच फडणवीसांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिल्याने पुन्हा एकदा अस्थिरतेचा प्रश्न निर्माण झाला. श्री. शरदचंद्र पवार यांच्या पुढाकाराने न भूतो न भविष्यती अशी महाराष्ट्राच्या राजकारणात योजना आखली आणि महाविकास आघाडीचा प्रयोग निर्माण झाला. शिवसेनेच्या ठाकरे कुटुंबातील व्यक्तीने प्रत्यक्ष सत्तेत सहभागी होऊन 28 नोव्हेंबर 2019 रोजी शपथ घेतली व 2019 च्या निवडणुकीच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर श्री.उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले. शिवसेना हा पक्ष आपल्या पारंपरिक मित्रपक्षाला सोडून पहिल्यांदाच काँगेस व राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये गेल्याने अनेकांनी भुवया उंचावले. याचा पडसाद म्हणून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक घटकाचा विचार करता अंतर्गत वादास नव्या पद्धतीने ठिणगी पडलेली होती. मध्यंतरीच्या करोनाच्या कालखंडात सर्व स्वस्थ बसलेले असताना महाराष्ट्राच्या राजकारणाचे प्यादे बऱ्याच अंशी फिरलेले होते. त्याचा अतिशय मोठा परिणाम शिवसेनेच्या फुटीत झाला. एका राजकीय पक्षाचे दोन गटात विभाजन झाले. महाविकास आघाडी बहुमताला समोर न जाता श्री.उद्धव ठाकरे यांच्या राजीनाम्याने सरकार कोसळली. महाराष्ट्राच्या राजकारणात ह्याअगोदर कधिच पक्षीय फुटाफूट झाली नव्हती,असे नाही. मात्र ही फुट बाळासाहेब ठाकरे यांनी वाढवलेल्या शिवसेनेत झाली असल्याने त्याचे प्रचंड पडसाद हे राजकीय पातळीवर पडले शिवाय सांस्कृतिक पातळीवर सुद्धा पडले. खरी शिवसेना हा प्रश्नचिन्ह निर्माण झाला. आणि शिवसेना पक्षातून पुन्हा एकदा महाराष्ट्राला मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या निमित्याने मिळाला. मतदारांनी दिलेल्या

निकालाचे सर्वस्वी पडसाद म्हणून या कालखंडात महाराष्ट्राला तीन मुख्यमंत्र्यांचा कार्यकाळ लाभला शिवाय अनेक प्रकरण महाराष्ट्राच्या राजकारणात सुरू झाले. यात भर म्हणून शेवटी श्री. शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही फूट पडली आणि श्री.अजित पवार यांचा एक वेगळा गट स्थापन झाला.

महाराष्ट्र विधानसभा 2019 च्या निवडणुकीत भाजप व शिवसेना यांची राष्ट्रीय लोकशाही आघाडी तर काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांची संयुक्त पुरोगामी आघाडी त्यांचा मित्रपक्षाला धरून होती. या पाच वर्षाच्या कालखंडात चार प्रमुख राजकीय पक्ष असणाऱ्या महाराष्ट्रात सहा प्रमुख राजकीय पक्ष अस्तित्वात आले.याचा संपूर्ण एक परिणाम हा मतदारांच्या वर्तनावर झाला. आणि याचा अंदाज सत्ताधाऱ्यांना हा 2024 च्या सर्वसाधारण लोकसभा निवडणुकीतिल निकालाच्या पार्श्वभूमीवर आला.

महाराष्ट्रामध्ये एकूण 48 लोकसभेच्या जागा आहेत. देशात श्री. नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात तिसऱ्यांदा भाजपाकडून निवडणूक पार पडणार होती. श्री.नरेंद्र मोदींच्या करिश्माचा प्रभाव हा येनकेन प्रकारे नाही म्हटला तरी अजूनही संपलेला नव्हता. कारण त्यांनी आपल्या कार्यकाळात आणलेल्या विविध योजनाचा फायदा हा समाजातील घटनांना होत होता शिवाय यामध्ये वाढ झालेली होतीच. याबरोबरच श्री. राहुल गांधी यांची भारत जोडो पदयात्रा संपूर्ण देशात निघाली होती. देशात निवडणुकीचे वातावरण अतिशय फिरलेले होते. यासाठी कारण म्हणजे निवडणुकीत दहा वर्षानंतर अनेक गंभीर अश्या मुद्यांवर लोकांचे मत तयार झाले होते. या 2024 च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्राच्या राजकारणातिल 2019 नंतरचा पट हा एक वेगळ्या पद्धतीने चालत होता. पाच टप्प्यात झालेल्या लोकसभा निवडणुकीत महायुती व महाविकास आघाडीचे प्रमुख सहा राजकीय पक्ष आपल्या मित्रपक्षांना घेऊन प्रथमच मंतदारांसमोर गेले. एकूण 61.29% मतदान 48 जागेसाठी झाले. यातील निवडणुकीच्या निकालात इंडिया म्हणजेच महाविकास आघाडीला 30 तर एनडीए म्हणजेच महायुतीला 17 जागेवर समाधान मानावे लागले. या निकलातून बरीच बाजू स्पष्ट झालेली होती. म्हणून समोरील येणाऱ्या विधानसभा निवडणुकीला सामोरे जातांना मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे व त्यांच्या मंत्रिमंडळानी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यात प्रामुख्याने माझी लाडकी बहीण योजना(1500) व विविध जातीच्या आधारावर स्थापन केलेले महामंडळे(17) बघता येईल.

2024 च्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका ह्या 20 नोव्हेंबर 2024 रोजी एकाच दिवशी 288 विधानसभा मतदारसंघात पार पडल्या. त्यात एकूण 66.05% मतदान झाले जे 1995 नंतरचे सर्वाधिक होते तर 2019 च्या तुलनेत 5% जास्त होते. 23 नोव्हेंबर 2024 रोजी निकाल लागला. गत 2024 झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील मतदारांनी जो कौल दिला होता त्याच्या उलट हा निकाल होता. महायुतीला 288 पैकी 235 जागा मिळाल्या तर महाविकास आघाडीला केवळ 50 जागांवर समाधान मानावे लागले.

| अ. क्र. | लोकसभा (48) 2024 | | | विधानसभा (288) 2024 | | |
|---|---|---|---|---|---|---|
| महायुती | राजकीय पक्ष | जिंकलेल्या जागा/ लढवलेल्या जागा | मतदान टक्के (%) | जिंकलेल्या जागा/ लढवलेल्या जागा | मतदान टक्के (%) | मतदान % फरक |
| 1. | भाजपा | 09 /28 | 26.18 | 132 /149 | 26.77 | +0.59 |
| 2. | शिवसेना (शिंदे ) | 07/15 | 12.95 | 57 /81 | 12.38 | -0.57 |
| 3. | रा. कॉ. (अ.पवार) | 01/ 04 | 3.60 | 41 /59 (230/288) | 9.01 (49.30) | +5.41 |
| एकुण | | (17/48) | (43.55) | महायुती(235/288) | महायुती(48.16) | +5.43 |
| महा. आघाडी | राजकीय पक्ष | जिंकलेल्या जागा/ लढवलेल्या जागा | मतदान टक्के (%) | जिंकलेल्या जागा / लढवलेल्या जागा | मतदान टक्के (%) | मतदान % फरक |
| 1. | काँग्रेस | 13/17 | 16.92 | 16 /101 | 12.42 | -4.5 |
| 2. | शिवसेना (उबाठा) | 09/21 | 16.52 | 20 /95 | 9.96 | -6.56 |
| 3. | रा. कॉ. (श. पवार) | 08/10 | 10.27 | 10 /86 (46/288) | 11.28 (33.66) | +1.01 |
| एकुण | | (30/48) | (43.71) | आघाडी (50/288) | आघाडी (35.16) | -11.06 |

वरील निकालाच्या आकडेवारीकडे बघितल्यानंतर आपल्याला अनेक बाबी जाणवतात. त्या म्हणजे लोकसभा व विधानसभा 2024 यातील मतांच्या टक्केवारीमध्ये व बदललेल्या महायुती व महाविकास आघाडी यांच्यातील जागामध्ये बरीच तफावत दिसून येते. हा मतदान टक्केवारीतील बदल मे-जून ते नोव्हेंबर 2024 या काळात झालेला आहे. याचा अर्थ इथे स्पष्ट होतो की, लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर मुख्यमंत्र्यांनी ज्या लोकोपयोगी योजना व निर्णय घेतले त्याचा खूप मोठा परिणाम हा मतदार वर्तनावर झालेला आहे. त्याचबरोबर भाजपा व शिंदे शिवसेना यांच्या टक्केवारी मध्ये फारसा बदल हा महायुतीमध्ये झालेला दिसून येत नसला तरी अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षानी बराच असा मोठा पल्ला गाठलेला दिसून येते. जवळपास 5.41% एवढी मतदानाची टक्केवारी वाढलेली आहे. तर महाविकास आघाडीला जवळपास 11% मतदानाची टक्केवारी ही खाली आलेली दिसते. मतदार वर्तनाच्या अनुषंगाने शरदचंद्र पवार व अजित पवार ह्या दोन्हीही नेत्यांची या ठिकाणी कसोटी होती असेही म्हणता येणार नाही कारण शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला लोकसभेपेक्षा 1% मताची टक्केवारी हे जास्त झालेले दिसते. म्हणजे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला लोकसभेपेक्षा विधानसभेच्या निवडणुकीमध्ये फायदाच झालेला दिसून येतो. तर काँग्रेस व शिवसेना (उबाठा) या दोन्हीही पक्षांची लोकसभेच्या तुलनेत विधानसभेमध्ये मतदानाची टक्केवारी अनुक्रमे जी4.5% व - 6.56% एवढी कमी

झालेली दिसते. साहजिकच या मतदान टक्क्याचा परिणाम हा निवडून आलेल्या जागेवर झालेला दिसून येतो. महत्त्वाचे म्हणजे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटांनी जी मताची टक्केवारी घेतली त्यामधून महायुतीला सरकार स्थापनेसाठी सोयीचे झाले.

**आरमोरी विधानसभा:**

महाराष्ट्र राज्यामधील गडचिरोली जिल्हा हा अतिपूर्वेकडील जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्याची स्थापना 26 ऑगस्ट 1982 रोजी झाली. झाडीपट्टी, जंगलव्याप्त व नक्षलग्रस्त प्रभावित असलेला भाग म्हणून सामान्यजनांमध्ये विशेष ओळख आहे. सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मागास अशा विषम परिस्थितीचा जिल्हा म्हणून बघावस मिळते. परिस्थितीनुकूल हा जिल्हा ग्रामीण तसेच आदिवासी बहुलतेने व्यापलेला आहे. राजकीयदृष्ट्या या जिल्ह्यात एकूण तीन विधानसभा मतदारसंघाचा समावेश होतो त्यापैकी आरमोरी हा विधानसभा मतदारसंघ अनुसूचित जमाती करिता राखीव आहे. भौगोलिकदृष्ट्या हा मतदारसंघ जिल्ह्याच्या उत्तरेकडे आहे. या मतदारसंघात कोरची, कुरखेडा, वडसा (देसाईगंज), आरमोरी व धानोरा तहसील मधील मुरूमगाव महसूल मंडळ चा समावेश होतो.

2019 व 2024 च्या विधानसभा निवडणुकीकडे बघितल्यानंतर प्रमुख राजकीय पक्ष म्हणून भाजपा व कॉंग्रेस हे दोनहे दोन दिसून येते. 2019 मध्ये श्री.कृष्णा गजबे हे दुसऱ्यांदा कॉग्रेसच्या श्री.आनंदराव गेडाम यांचा पराभव केला. श्री.आनंदराव गेडाम 2004 व 2009 मध्ये आमदार म्हणून या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. 2014 मध्ये त्यांनी तिसऱ्यांदा काँग्रेसच्या तिकीटावर निवडणूक लढवली होती.मात्र 2014 च्या निवडणुकीत त्यांना पराभव स्विकारावा लागला. तसेच 2014 व 2019 मध्ये भाजपच्या तिकीटावर कृष्णा गजबे यांनी निवडणूक लढवली आणि आमदार म्हणून प्रतिनिधित्व केले होते . मात्र 2024 च्या निवडणुकीत भाजपला संपूर्ण महाराष्ट्रात चांगली परिस्थिती असतानाही कॉंग्रेसच्या श्री. रामदास मसराम यांच्यासमोर पराभव पत्करावा लागला.

| **अ.क्र.** | **उमेदवार व राजकीय पक्ष** | **विधानसभा 2019 (1,81,271-71.55%)** | **उमेदवार व राजकीय पक्ष** | **विधानसभा 2024 (2,02,267-76.97%)** | **मतदान व टक्केवारीतील फरक** |
|---|---|---|---|---|---|
| 1. | श्री. कृष्णा गजबे (भाजपा) | 75,077(41.42%) | श्री.कृष्णा गजबे (भाजपा) | 92,299 (45.4%) | **+3.98** |
| 2. | श्री.आनंदराव गेडाम(कॉग्रेस) | 53,410(29.46%) | श्री.रामदास मसराम(कॉंग्रेस) | 98,509 (48.46%) | **+19** |
| 3. | सुरेन्द्रसिंह चंदेल (अपक्ष) | 27,027(13.80%) | अनिल केरामी (बसपा) | 3,438 (1.69%) | **-12.11** |

वर दिलेल्या तक्त्यावरून असे दिसून येते की, श्री. कृष्णा गजबे यांना 2019 पेक्षा 2024 च्या निवडणुकीत +3.98 % मत हे जास्तीचे मिळाले. मात्र 2024 च्या निवडणुकीत ते पराभूत झाले. याचे कारण असे की, 2019 मध्ये अपक्ष राहिलेले सुरेंद्रसिंह चंदेल यांचे मत 2024 च्या निवडणुकीत विभागले गेले असले तरी त्याचा फायदा हा काँग्रेसच्या श्री. रामदास मसराम यांना निवडून येण्यात झालेला आहे. शिवाय ह्या निवडणुकीत दोन वेळा निवडून व पराभूत झालेले श्री. आनंदराव गेडाम 2024 मध्येही निवडणूक लढले मात्र त्यांचा ह्या ठिकाणी दारुण पराभव झाला त्यांना केवळ 1954(0.96%) एवढेच मत मिळाले. तिसऱ्या स्थानावर सुद्धा ते येऊ शकले नाही. आरमोरी विधानसभेच्या बाबतीत हे विशेषत्वाने बघता येईल की, महाराष्ट्राच्या राजकारणाचा पट ह्या ठिकाणी चालला नाही. बाजूच्या गडचिरोली व अहेरी ह्या दोन्ही विधानसभेत महायुतीचे उमेदवार निवडून आले आहेत. ह्या मतदारसंघात दोन पेक्षा जास्त वेळा एकाला निवडून न देता दुसऱ्या उमेदवाराला संधी देण्यात इथले मतदार महत्वाचे ठरवतात. कारण काँग्रेसची तब्बल 19% ची मतांची टक्केवारी 2019 च्या तुलनेत वाढलेली आहे.

**मतदार वर्तनाचे घटक :**

राजकीय सहभागाचा सर्वात सोपा प्रकार म्हणजे मतदानाची प्रक्रिया होय. मतदानाच्या अनुषंगाने समाजातील विविध घटकातील लोक हे राजकीय दृष्ट्या सहभाग नोंदवीत असतात. त्या अनुषंगाने मतदानविषयक अभ्यास हा मतदाराच्या वर्तनावर ठरतो. मतदारांचा वर्तन हा त्यांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व भौगोलिक घटकाने ठरत असल्याकारणाने यातील विविध घटकांचा परिणाम हा मतदार वर्तनावर पडत असतो.

आरमोरी विधानसभा मतदारसंघाच्या अनुषंगाने कुटुंब हा घटक विचारात घेतल्यास आदिवासी व गैर आदिवासी कुटुंब यांचा विचार प्रामुख्याने करावा लागतो. जातीचा विचार केल्यास या मतदारसंघात गोंड,प्रधान,गोवारी,हलबा- हलबी, कुणबी, तेली,कोष्टी इत्यादींचा समावेश मोठ्या प्रमाणात आहे. लिंगाच्या आधारानुसार यामध्ये पुरुष व महिला मतदाराचा प्रमाण हा अनुक्रमे 131060 व 131710 एवढा आहे. जो मतदानात 102720 व 92546 रूपांतरित झाला आणि 78.38% व 75.58% एवढा राहीला. वय हा घटक देखील मतदार वर्तनावर प्रभाव पाडतो. वयाच्या बाबतीत मतदार हे युवा वर्गातील जास्त असल्याने एखाद्या विचारसरणी बरोबरच त्यांच्या प्रश्नाच्या अनुषंगाने विचार करतात. त्याचा सहसंबंध बऱ्याचदा जुळून येताना दिसतो. आरमोरी हा आदिवासी बहुल असल्याने यातील आदिवासी जंगोम सेना नव्याने उभ्या झालेल्या आहेत. कोरची तालुक्यातील अनेक ग्रामसभेच्या विरोधात शासनाने प्रकल्पाचे निर्णय घेतले, तत्कालीन आमदार हे कुठलीच अशी ठोस भूमिका आदिवासींच्या बाबतीत घेतलेली नव्हती.त्याचाही आदिवासी युवकांमध्ये असंतोष होता.

प्रचार मोहीम देखील मतदार वर्तनावर परिणाम करत असते. प्रचारात वापरले जाणारे तंत्रे, नेतृत्व त्यातील शैली यांचा खूप मोठा परिणाम हा मतदारांवर पडत असतो.प्रचारासाठी भाजपाकडून देवेंद्र फडणवीस व इतर नेते होते तर काँग्रेस कडून प्रियंका गांधी व इतर नेते वडसा या ठिकाणी आलेले होते. याचे पर्यवसान नक्कीच मतदार वर्तनावर झाले.कारण दोन्हीही सभेला प्रचंड असा मतदार वर्गांचा समुदाय हा जमलेला होता. राजकीय

परिस्थितीत बदलाच्या बाबतीत सुद्धा मतदार वर्तनावर प्रभाव पडत असते.आरमोरी विधानसभेच्या बाबतीत विचार केल्यास असे दिसून येते की या ठिकाणी आजपर्यंत कोणीच तिसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून आलेला नाही.नव्या उमेदवारांना संधी देण्याचे प्रयोजन येथील सामान्य जनता करीत असते.तसेच दहा वर्षांचा कार्यकाळातील लेखाजोगा हा मतदारांसमोर जमा होत असल्याने नेतृत्व बदलण्याची भूमिका हे राजकीय स्थित्यंतराचा घटक बनून जात असते. म्हणून या ठिकाणी काँग्रेसच्या बाबतीत सरशी झालेली दिसते.

**मूल्यांकन:**

आरमोरी विधानसभा निवडणुकीच्या निकालावर मतदार वर्तनाचा प्रभाव हा एक वेगळ्या पद्धतीने पडलेला दिसतो. महाराष्ट्राच्या बाबतीत विचार केल्यास असे दिसून येते की, या ठिकाणी राज्य सरकारद्वारे घेण्यात आलेल्या निर्णयांचा परिणाम हा मतदाराच्या वर्तनामध्ये झालेला आहे. मात्र आरमोरी विधानसभा याबाबतीत अपवाद ठरते.कारण येथील सामान्य जनता हे स्थानिक मुद्द्यांना धरून निवडणुकीला सामोरे गेले व त्यांच्या एकत्रित परिणाम म्हणून हा निकाल दिसून येते. एकंदरीत आपणास असेही दिसते की, 2004 पासून श्री.आनंदराव गेडाम हे काँग्रेसतर्फे उमेदवार असल्याने स्थानिक मतदार हा नाराज होता.शिवाय अतिशय शांतप्रिय व सामान्य लोकांना सहज भेटू शकतील असे व्यक्तिमत्व त्यांच्यासमोर श्री.कृष्णा गजबे यांच्या रूपाने असल्याने मतदार हे भाजपाला मतदान करताना दिसून आले.मात्र आरमोरी विधानसभेच्या बाबतीत हेही नाकारता येत नाही की, या मतदारसंघात शिक्षकी पेशेतला आमदार म्हणून काँग्रेसच्या श्री. रामदास मसराम यांच्या माध्यमातून मिळाला. कारण या मतदार संघात शिक्षक म्हणून राहिलेले शिवसेनेचे श्री.हरिराम वरखडे त्याचबरोबर श्री. आनंदराव गेडाम यांच्यावर येथील जनतेने विश्वास ठेवला होता. शिवाय सलग दोन वेळा आमदार झालेल्यांना येथील मतदार तिसऱ्यांदा संधी नाकारतात. महाराष्ट्राच्या विधानसभेत महायुती सरकारच्या काळात घेतल्या गेलेल्या लाडक्या बहिणी योजनेच्या मतामार्फत निवडून आली असली तरी त्याचा प्रभाव हा आरमोरी विधानसभेच्या बाबतीत म्हणूनच अपवाद ठरतो. शिवाय स्थानिक मुद्दे या निवडणुकीत मतदारांच्या वर्तनावर प्रभावशील ठरले ज्याचा परिणाम निवडणुकीच्या निकालात झाला.

**संदर्भ:**

- भोळे भा. ल., भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे प्रकाशन, 2008,नागपूर.
- फाडिया व फाडिया, भारतीय शासन एवं राजनीती, साहित्यभवन प्रकाशन,2020, नवी दिल्ली.
- डॉ. महेंद्र पाटील, निवडणूक व्यवस्थापन, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव

**वेबसाईट :**

- eci.gov.in, gadchiroli.gov.in

**दैनिक वृत्तपत्रे :**

- लोकमत, लोकसत्ता , सकाळ आदी.